(ESTD. 1965)
Gondia Education Society's
SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &
SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE
Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara
Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301
Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in

Ref. No. : SNMC/2022-23 Date : 20.10.2022

# नविन बदललेला अभ्यासक्रम या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गृहअर्थशास्त्र विषयाच्या बोर्ड ऑफ स्टडीज स्पेशल टास्क कमिटी, गोंदिया शिक्षण संस्थेच्या एस. एन. मोर कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, तुमसर, आणि स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाच्या महिला महाविद्यालय नंदनवन, नागपूर व वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नविन राष्ट्रीय शिक्षण प्रणाली त्यानुसार गृहअर्थशास्त्र या विषयाचा पदवी व पदव्युत्तर स्तरावर नविन बदललेला अभ्यासक्रम या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा दिनांक १८ ऑक्टोबर २०२२ रोजी मदर टेरेसा हॉल, नागपूर विद्यापीठ बी.एड. कॉलेज, लॉ कॉलेजच्या बाजूला, लॉ कॉलेज चौक, नागपूर येथे आयोजीत करण्यात आलेली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. संजय दुधे सर, एस. एन. मोर कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्सचे प्राचार्य मा. चेतनकुमार मसराम सर, डॉ. वंदना भागडीकर, प्राचार्य, महिला महाविद्यालय नंदनवन, नागपूर आणि वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था नागपूरच्या संचालक डॉ. साधना शिलेदार, डॉ. राजश्री वैष्णव, अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यासमंडळ आणि गृह अर्थशास्त्र विषयाच्या बोर्ड ऑफ स्टडीज स्पेशल टास्क कमिटीच्या अध्यक्ष डॉ. भारती काटेखाये उपस्थित होत्या.

कार्यशाळेचे प्रास्ताविक बोर्ड ऑफ स्टडीज स्पेशल टास्क कमिटीच्या अध्यक्ष डॉ. भारती काटेखाये यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी कार्यशाळेच्या उद्देशाबाबत सविस्तर माहिती दिली. एस. एन. मोर कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्सचे प्राचार्य मा. चेतनकुमार मसराम सर, गृहअर्थशास्त्र हा विषय मुलींना स्वयंरोजगाराच्या दृष्टीने कसा उपयुक्त आहे याबाबत माहिती दिली. डॉ. वंदना भागडीकर, प्राचार्य यांनी नविन बदललेला अभ्यासक्रम विद्यार्थी दृष्टीकोनातून कसा उपयुक्त आहे याबाबत माहिती दिली. त्याचप्रमाणे डॉ. साधना शिलेदार यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार कसे विषय निवडता येतील याबाबत मार्गदर्शन केले. नागपूर विद्यापीठाचे प्रकुलगुरु मा. डॉ. संजय दुधे यांनी महिला व स्वयंरोजगार या विषयावर प्रकाश टाकला. याप्रसंगी २०२१-२०२२ मध्ये ज्या विद्यार्थ्यांना आचार्यपदवी प्राप्त झाली अशा सर्वांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. संपदा नासेरी यांनी केले.

डॉ. राजश्री वैष्णव, अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यासमंडळ यांनी नविन राष्ट्रीय शिक्षण प्रणाली २०२० ची अंमलबजावणी याबाबत सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे पदवीयुत्तर अभ्यासक्रमातील बदलांबाबत सविस्तर माहिती व चर्चा करण्यात आली. यामध्ये डॉ. संध्या देवळे, डॉ. अद्विता देशमुख, डॉ. अनुराधा निसळ आणि डॉ. संपदा नासेरी यांचा प्रमुख सहभाग होता. पदवी स्तरावरील अभ्यासक्रमाबाबत डॉ. क्षमा चव्हाण, डॉ. सीमा पांडे व डॉ. संपदा नासेरी यांनी सविस्तर चर्चा केली.

कार्यशाळेच्या समारोपीय कार्यक्रमांस अध्यक्ष म्हणून मानवविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाठमोडे लाभले होते. प्रमुख पाहुण्या डॉ. अनिता दाणी माजी अध्यक्ष गृहअर्थशास्त्र विभाग या लाभलेल्या होत्या. याप्रसंगी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तयार करण्याकरीता ज्यांनी अतिशय परिश्रम घेतले त्या सर्वांचा सत्कार करण्यात आला. डॉ. दमयंती घागरगुडे, डॉ. रिता खोब्रागडे यांनी कार्यशाळेच्या यशाबाबत आपले मत व्यक्त केले. नविन शैक्षणीक धोरण विद्यार्थी स्वतःच्या व पर्यायाने देशाच्या विकासाकरीता कसा उपयोग करुन घेतील याबाबत सविस्तर मार्गदर्शन आपल्या अध्यक्षीय भाषणांतून डॉ. दत्तात्रय वाठमोडे यांनी केले.

याप्रसंगी नागपूर विद्यापीठाअंतर्गत विविध महाविद्यालयातील बहुसंख्य प्राध्यापकांचा सहभाग होता.










